





दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १८५ •शनिवार, दि.०४ ऑक्टोबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955




## 'शेतीला नोकरीचा दर्जा आणि शेतकऱ्यांना 10 हजार पगार द्या'



# मनोज जरांगे पाटील यांची मागणी; दसरा मेळाव्यात मांडले शेतकऱ्यांचे प्रश्न

**बीड । प्रतिनिधी**

बीडमधील नारायणगडावर आज मनोज जरांगे पाटील यांच्या दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर भाष्य केले आहे. यावेळी त्यांनी सरकारकडे शेतकऱ्यांसाठी विविध मागण्या करत शेतीला नोकरीचा दर्जा देण्याची आणि शेतकऱ्यांना पगार देण्याची मागणी केली आहे. नारायणगडावरील भाषणात बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी मागणी केली की, शेतीला नोकरीचा दर्जा देण्यात यावा. जे १० एकरच्या आतील शेती ▶▶ उर्वरित पान २ वर

*• जरांगे पाटील म्हणाले की, जर सरकारने दिवाळीपर्यंत मराठवाड्यातील मराठ्यांना आरक्षण आणि शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण केले नाही तर जिल्हा परिषद निवडणुकीत सरकारची एकही जागा शेतकऱ्यांनी निवडून द्यायची नाही. तसेच या मागण्या पूर्ण केल्या नाहीत तर स्थानि स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत मतदान प्रक्रिया होऊ देणार नाही.*

*• जरांगे पाटलांनी काही राजकीय नेत्यांवर निशाणा साधला. ते म्हणाले – आरक्षण घेऊन बोगस लोक खुर्चीवर बसले आहेत. हे लोक फे टीव्हीवर बोलतात, मोठ्या गाड्यात फिरतात. पण ४० वषारत समाजाला काही दिलं नाही. उलट आपल्यातूनच काही गद्दार पुढे आले. ते पुढे म्हणाले की, आपल्या जातीचं खरं काम प्रशासनातले अधिकारीच करून दाखवतात. सत्ता असो वा नसो, अधिकारी असेल तर खुटा ठोकून ठेवतो. म्हणून आता मराठा समाजाने आपल्या मुला– मुलींना अधिकारी बनवलं पाहिजे.*

# जातीयवाद, धर्मवादाचे राक्षस नेस्तनाबूत करा! दसरा मेळाव्यात मंत्री पंकजा मुंडे यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

'आपण कधीही जातिभेद केला नाही. माणसाकडे जातीय कंगोऱ्यांनी पाहायचे कधी मी शिकले नाही. दिवंगत गोपीनाथ मुंडे यांनीही कधी जातभेद करून कोणाला वागणूक दिली नाही. त्यांच्या जातिभेदापलीकडच्या माणुसकीने पाहण्याचा आणि संघर्षाचा वारसा घेऊनच माझीही वाटचाल सुरू असून, सम ाजघटकाला खाली मान घालायला लावणारे कृत्य माझ्याकडून कधीही घडणार नाही,' असे सांगत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांनी कलियुगात रक्तबीजासारखे, भस्मासुरासारखे जातिवादाचे आणि धर्मवादाचे जे राक्षस जन्माला आले आहेत, त्यांना नेस्तनाबूत करण्याचे आवाहन सावरघाट (ता. पाटोदा) येथील दसरा मेळाव्यात गुरुवारी



बोलताना केले.

गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतर भगवानगडावर दसरा मेळावा घेऊ दिला गेला नसल्याच्या आठवणी सांगत आणि सावरघाटमध्ये मेळावा घेण्यापर्यंतचा प्रवास पंकजा मुंडे यांनी या वेळी मांडला. भगवान गडाच्या पायथ्याशी एकदा मेळावा घ्यावा लागला. सावरघाट हे भगवान बाबांचे मूळ जन्मगाव आहे, हे कोणाला माहीतही नव्हते. परंतु आता येथील मेळावा ही एक परंपरा होऊन गेली, असे सांगून पंकजा मुंडे यांनी हुल्लडबाजी करणाऱ्यांना सुनावत भगवानगडावरील दसरा मेळावा हिरावून घेतला, आता हा मेळावाही तुम्हाला बंद पाडायचा आहे का? असा प्रश्न केला. व्यासपीठावर माजी मंत्री, आमदार धनंजय मुंडे, माजी ▶▶ उर्वरित पान २ वर

# साहेब गेल्यानंतर बहिणीने मेळाव्याची परंपरा जिवंत ठेवल्याचा अभिमान : धनंजय मुंडे



### मराठा आरक्षणाबाबत मोठे विधान

**धनंजय मुंडे यांनी आरक्षणाच्या विषयावर भाष्य करताना स्पष्ट केले की, मराठा समाजाला आरक्षण मिळाले याचा आनंद आहे. पण काही जण आरक्षणाच्या आडून ओबीसीमधील हक्क गाठायचा प्रयत्न करत आहेत. हे कुणाला फसवत आहेत? स्वत...ची खुर्ची वाचवण्यासाठी हे सुरू आहे. सरकारने जेवढं शक्य ते केलं आहे. पण एका ताटातलं काढून दुसऱ्या ताटात टाकणं बरोबर नाही, असे ते म्हणाले.**

**बीड । प्रतिनिधी**

भगवानगडावरील पंकजा मुंडे यांच्या दसरा मेळाव्यात माजी मंत्री व आमदार धनंजय मुंडे यांनी भावनिक भाषण करत आपल्या मनातील खंत व्ये केली. मी २५० दिवस शांत होतो. माझी बहीण मला आधार देत होती. माझ्या विरोधात मिडिया ट्रायल सुरू होती. कोर्टाने मला क्लीन चिट दिली, तरीही मी शिक्षा भोगतोय, असे त्यांनी ठामपणे सांगितले. मुंडे पुढे म्हणाले की, त्यांच्या विरोधात खोटे घोटाळे उकरून काढले गेले, कोर्टात खटले दाखल झाले, पण न्यायालयाने त्यांना निर्दोष ठरवले. उलट कोर्टात जाणाऱ्यांनाच लाख रुपयांचा दंड बसला. तरीदेखील ते मानसिकरीत्या शिक्षा भोगत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मेळाव्याची परंपरा मोडली नाही धनंजय मुंडे म्हणाले की, अभूतपूर्व हा दसरा मेळावा मुंडे साहेबांची देणगी आहे. पूरस्थिती आणि अतिवृष्टीमुळे मेळावा होईल की नाही, अशी वेळ आली होती. पण चर्चा करून परंपरा मोडायची नाही, ▶▶ उर्वरित पान २ वर

### विजयादशमी मुहूर्तावर नवीन मच्छिंद्रनाथ मंदिराचा शीला रोहन कार्यक्रम संपन्न

# नाथ भक्तांनी सढळ हाताने मदत करण्याचे आ.सुरेश धस यांचे आवाहन

**आष्टी । प्रतिनिधी**

साडेतीन मुहूर्तांपैकी अत्यंत मंगल असलेल्या विजयादशमीच्या मुहूर्तावर श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथगड मायंबा येथील नवीन दगडी मंदिर बांधकामाच्या शीला रोहनाचा शुभारंभ देवस्थानचे विश्वस्त आ. सुरेश धस यांचे हस्ते करण्यात आला. या वेळी मदन महाराज देवस्थानचे अध्यक्ष हरिभक्त परायण ▶▶ उर्वरित पान २ वर



# लाडक्या बहिणींची केवायसी बंद सेतू केंद्रावर महिलांची गर्दी

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या चार महिन्यांपासून राज्य सरकारने सत्तेवर आल्यापासून लाडक्या बहिणींची संख्या कमी करण्यासाठी वेगवेगळे निकष लावले आहेत. त्यातच गेल्या एक महिन्यापूर्वी त्यांनी या सर्व लाडक्या बहिणींनी आपली केवायसी केल्याशिवाय त्यांना या योजनेचे दीड हजार रुपये मिळणार नाही, असा निर्णय घेतला मात्र निर्णय घेतल्यापासून या केवायसीची वेबसाईय पूर्णपरे बंद आहे. केवायसी करण्यासाठी महिला सेतू केंद्रावर जातात आणि पुन्हा रिकाम्या हाताने परततात. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने लाहकी बहिण योजना सुरू केली. त्यामुळेच



सत्तेवर आलेल्या सरकारने लाडक्या बहीण योजनेतून महिलांची संख्या कमी करण्यासाठी सरकारी कर्मचारी महिला, ज्या महिलांचे पती इन्कम टॅक्स भरतात अशा सर्व महिलांना या योजनेतून ▶▶ उर्वरित पान २ वर

# कपिलधारवाडी च्या ग्रामस्थांचे जीव धोक्यात; तातडीने पुनर्वसन करा-आ.संदीप क्षीरसागर

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, आपत्ती विभाग मंत्र्यांना दिले पत्र


**बीड । प्रतिनिधी**

मागील काही काळात सततच्या मुसळधार पावसामुळे व अतिवृष्टीमुळे कपिलधारवाडी येथे भूस्खलन झाले आहे. यामुळे गावकऱ्यांचा जीव धोक्यात असून त्यांचे तात्काळ पुनर्वसन करण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. मौजे पाली ग्रामपंचायत अंतर्गत कपिलधारवाडी छोटेसे ९० कुटुंबाचे गाव वास्तव्यास आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे



वातीवृष्टीमुळे सदरील गाव अतिशय गंभीर संकटात सापडले आहे. या ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीमुळे गावांम ध्ये भूस्खलन सुरू झाले असून जमिनीत, डोंगराच्या कडेला, रस्त्यावर, शाळा खोली, घरे, मंदिरे, संरक्षण भिंत व इतर ठिकाणी मोठ्या भेगा व तडे गेले असून त्यात सातत्याने वाढ होत आहे. ग्रामस्थांना घरी जाणे धोकादायक झाल्याने ग्रामस्थांना, आबालवृद्धांना,महिला भगिनींना, शाळकरी ▶ उर्वरित पान २ वर

# तलवाड्यात घडली हृदय हेलवणारी घटना ४ महिन्याच्या चिमुकल्याला बॅरेलमध्ये टाकून बापाने गळफास घेतला



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील वेदनादायी घटना, चिमुकल्याचा जागीच मृत्यू बापानेही संपवले जीवन समाजमन हादरले चार महिन्याच्या बालकाची हत्या पोटच्या मुलाची हत्या करुन स्वतः जीवन संपवनारा निर्दयी बाप अमोल सोनवणे याने चार महिन्याच्या चिमुकल्या मुलाला पाण्याच्या बॅरलमध्ये टाकून स्वताह गळफास घेत जीवन संपवल्याची दुदैवी घटना गेवराई तालुक्यातील तलवाडा जवळील रामनगर याठिकाणी पहाटे सुमारास घडली. कौटुंबिक कलह किती भयंकर रूप धारण करू शकते, याचे ज्वलंत उदाहरण समोर आले असून समाजमनाला हेलवणारी घटना आसल्याचे बोलल्या जात आहे. गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील रामनगर भागात घडलेली ही हृदयद्रावक घटना संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त करणारी ठरली आहे. पती-पत्नीतील वादातून हतबल होऊन अमोल हौसराव सोनवणे (वय ३०) यांनी आपल्या केवळ चार महिन्यांचा म ुलाला पाण्याच्या बॅरलमध्ये टाकले. बॅरलमध्ये पाणी असल्याने चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला. यानंतर अमोल यांनी स्वतःही गळफास घेऊन आत्महत्या केली. सदरील घटना दिनांक ३ ऑक्टोबर रोजी पहाटे सुमारास चार वाजता घडली. यावेळी अमोलची पत्नी पायल झोपेत होती. सकाळी घडलेला हा प्रकार उघडकीस आला तेव्हा घरात ▶▶ उर्वरित पान २ वर



# अंबासाखर इतर कारखान्याच्या बरोबरीने भाव देणार - चेअरमन रमेशराव आडसकर, व्हाईस चेअरमन दत्तात्रय पाटील यांची माहिती

## विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर अंबासाखरचा बॉयलर अग्नी प्रदिपन समारंभ



अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम सन २०२५-२६ साठीचा बॉयलर अग्नी प्रदिपन समारंभ सभासद, ऊस उत्पादक शेतकरी आणि कामगार यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरूवार, दिनांक २ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलताना अंबासाखर इतर कारखान्याच्या बरोबरीने भाव देणार असे चेअरमन रमेशराव आडसकर, व्हाईस चेअरमन दत्तात्रय पाटील यांनी जाहीर केले.

याप्रसंगी ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे शुभाशीर्वाद लाभले. तर प्रारंभी सौ.विजयाताई व दत्तात्रय ज्ञानोबाराव पाटील (व्हाईस चेअरमन) तसेच सौ.पल्लवी व रमाकांत बाळासाहेब पिंगळे (संचालक) यांच्या शुभहस्ते विधीवत पूजा करून हा बॉयलर अग्नी प्रदीपन समारंभ संपन्न झाला. प्रारंभी उपस्थित मान्यवरांचा कारखान्याच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यानंतर बोलताना अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर म्हणाले की, या भागात कारखाना मंजुरीसाठी ३ प्रस्ताव होते. परंतु, तीन जिल्ह्यांचे मध्यवर्ती ठिकाण म्हणून १९६९ साली अंबा साखरची सुरूवात झाली. कारखान्यास यावर्षी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. मागील ५० वर्षांमध्ये या कारखान्याने अनेक चढउतार पहिले आहेत. तसेच आपण अनेक अडचणींना सामोरे ही गेलेलो आहोत. या कारखान्याचे दिवंगत संस्थापक मा.ज्ञानोबारावजी पाटील साहेब व संस्थापक माजी आमदार बाबुरावजी आडसकर साहेब, भगवानराव बापू लोमटे, आनंदराव बापू चव्हाण, ॲड.चेवले साहेब यांच्यासह सहकाऱ्यांनी लावलेल्या या सहकाराच्या रोपट्यामुळे या भागात सहकार चळवळीला बळकटी मिळाली. तसेच या परिसराच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी मोठी मदत ही झाली. साखर कारखानदारी दर तीन ते चार वर्षांत दुष्काळाला सामोरे जाते. त्यामुळे गाळपात सातत्य राहत नाही व हा उद्योग हंगामी चालत असल्यामुळे वेळोवेळी कारखानदारी समोर आर्थिक अडचणी ही उभ्या राहतात.

अशा परिस्थिती मध्ये अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना टिकला पाहिजे यासाठी माझे सन २००९ पासूनच प्रामाणिक प्रयत्न राहिलेले आहेत. राज्य व केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय सहकार विकास निगम, नवी दिल्ली यांच्याकडून खेळत्या भांडवलासाठी मार्जिन मनी लोन ८० कोटी रूपये मंजूर करून घेतले. यातून बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, सांगली, पतसंस्था, शुगरकेन डेव्हलपमेंट फंड, नवी दिल्ली या संस्थांची एक रकमी परत फेडीनुसार थकित देणे देण्यात आली. तसेच थकीत तोडणी वाहतूक करार, थकीत प्रॉव्हिडंट फंड व महावितरणच्या थकलेल्या रकमेसह या सर्व रकमा कारखान्याने अदा केल्यामुळेच व उर्वरित रकमेचा उपयोग ही या कारखान्याची जुनी झालेली यंत्रणा व बॉयलर, मिल, टर्बाईन, मशिनरीची देखभाल दुरूस्ती व काही प्रमाणात मशिनरीचे आधुनिकीकरण करण्यात आलेले आहे. आवश्यक बांधकाम, त्यामुळे ८० कोटी रूपये कर्जाचा विनियोग अत्यंत काटकसरीने व योग्य पद्धतीने करण्यात आलेला आहे. पैसे कमी पडत असल्याने व्हाइस चेअरमन दत्तात्रय आबा पाटील, संचालक राजाभाऊ औताडे व मी आम्ही मिळून वैयक्तिक पैसे एकत्र जमवून राहिलेली कामे करीत आहोत. ऊस तोडणी वाहतूक रक्कम ही अदा केली आहे. त्यामुळे पुढील १५ दिवसांत संपूर्ण यंत्रणा कार्यान्वित करण्याचा प्रयत्न आहे. आगामी हंगाम २०२५-२६ मध्ये गाळपाचे उद्दिष्ट ठेवून त्याप्रमाणे नियोजन करण्यात आलेले असून, कारखाना अत्यंत कार्यक्षमतेने चालविणार आहोत. कारखान्याकडे असणारी ३० के.एल.पी.डी.असवानी प्रकल्पातील आपण रेक्टिफाइड स्पिरीटचे उत्पादन घेत होतो, मात्र यापुढे आपण इथेनॉल निर्मिती करण्याचा निर्णय आमच्या संचालक मंडळाने घेतलेला आहे. त्यामुळे काही प्रमाणात कारखान्याला आर्थिक फायदा होणार आहे. कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये ऊसाचे उत्पादन वाढीसाठी यापुढे प्रयत्न करणार आहोत. एआय - कृत्रिम बुद्धिमतेचा वापर करून परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस उत्पादन वाढीसाठी त्याचा फायदा होणार आहे. त्यामुळे यापुढे हा कारखाना सक्षमपणे चालविणार आहोत असे सांगून चेअरमन आडसकर यांनी आपल्या सर्वांचे सहकार्य व मदतीने अंबा कारखान्याला गतवैभव प्राप्त होईल. त्यामुळे सभासद व ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून आपला ऊस कारखान्यास गाळपाकरीता पुरविण्यात यावा अशी विनंती व आवाहन केले. तसेच उपस्थित कारखान्याचे सर्व संबंधीत सभासद, संचालक मंडळ सदस्य अधिकारी, कर्मचारी, तोडणी वाहतुक कामगार, व्यापारी, पत्रकार, हितचिंतक यांनी जे आपले अनमोल सहकार्य केले या बद्दल पुनःश्च सर्वांचे मनपूर्वक आभार मानतो. असे चेअरमन आडसकर यांनी सांगितले. तर प्रारंभी व्हाईस चेअरमन दत्तात्रय पाटील यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. काळाची पावले ओळखून आम्ही उशिरा का होईना पण, एकत्र आलो आहोत. व यापुढे ही एकत्रितपणेच काम करणार आहोत. असे सांगून अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याला फिनिक्स पक्षाप्रमाणे उभारी द्यायची आहे. १ तारखेला कामगारांना पगार दिला आहे. ऊस उत्पादक शेतकरी व कामगार ही या कारखान्याच्या रथाची दोन चाके आहेत. त्यांना न्याय देण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. अंबा साखरला सचोटीने, चांगल्या पद्धतीने चालविण्यासाठी विद्यमान संचालक मंडळ तयार आहे, मांजरा धरण भरल्याने पुढील दोन-तीन वर्षे ऊस कमी पडणार नाही. त्यामुळे कारखान्याला गतवैभव मिळवून देवूत, गरजेप्रमाणे मनुष्यबळ वापरले जाईल. अर्थसहाय्य उपलब्ध करून दिल्याबद्दल केंद्र व राज्य सरकार यांचे व्हाईस चेअरमन पाटील यांनी आभार मानले. ते पुढे म्हणाले की, यावर्षी हा कारखाना इतर कारखान्याच्या बरोबरीने भाव देणार असून सर्व शेतकऱ्यांनी आपला ऊस कारखान्याला गाळपासाठी देण्याचे आवाहन ही पाटील यांनी. यावेळी माजी आमदार संजयभाऊ दौंड, अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांनी ही आपले समायोचित विचार व्यक्त केले. या समारंभाला अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे सर्व संचालक श्री.ॲड.प्रमोद जाधव, ऋषिकेश आडसकर, संभाजी इंगळे, लक्ष्मीकांत लाड, गोविंद देशमुख, राजाभाऊ औताडे, विजय शिनगारे, बाळासाहेब सोळंके, मधुकर शेरेकर, अनिल किर्दंत, जिवन कदम, लालासाहेब जगताप, अनंत कातळे, विठ्ठल देशमुख, शशिकांत लोमटे, मिनाज पठाण, रमाकांत पिंगळे, श्रीमती भागिरथी साखरे आणि प्रभारी कार्यकारी संचालक एस.बी. साखरे, कार्यकारी संचालक दत्तात्रय मरकड यांच्यासह केज कृ.उ.बा.समितीचे सभापती अंकुशराव इंगळे, अंबाजोगाई पिपल्स को ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन प्रकाश सोळंकी, संचालक ॲड.विष्णुपंत सोळंके, संचालक वसंतराव चव्हाण, अंबाजोगाई कृ.उ.बा.समितीचे माजी सभापती विलासराव सोनवणे, माजी उपनगराध्यक्ष बबनराव लोमटे, ॲड.बाळासाहेब ज्ञानोबाराव पाटील, ज्येष्ठ नेते नवाब मामू, भारत पिंगळे, दाजिसाहेब लोमटे, शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदास आपेट, धारूर कृ.उ.बा.समितीचे उपसभापती सुनील शिनगारे, लातूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य साहेबराव पवार, सेवा सहकारी सोसायटी आडसचे चेअरमन उध्दवराव इंगोले, अजय (चिमू) पाटील, शिवाजीराव मायकर, रमेश नखाते, धारूर पंचायत समितीचे माजी सभापती विलासराव खुळे, धारूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भारतराव सोळंके, विजयकुमार खुळे, खोडसचे सरपंच रामधन लाखे, भगवानसेठ भन्साळी, विजयकुमार खुळे, अनंतराव पाटील, ॲड.बालासाहेब इंगळे, रामकिसन खोडसे, शशी आडसकर, रणजित लोमटे, पांडुरंग पाखरे, शिवाजीदादा कुलकर्णी, रणजित आडसकर. शिंदे मामा, बाळासाहेब देशमुख, राजपाल देशमुख, अनिल माचवे सर यांच्यासह सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते आणि बहुसंख्येने सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे चीफ अकाउंटंट सुरेश बोराटे, वर्क्स मॅनेजर धीरज वाघोले, मुख्य शेतकी अधिकारी सचिन बागल, चिफ केमिस्ट केशव पाटील, ऊस पुरवठा अधिकारी आनंद शिंदे, चीफ इंजिनिअर प्रशांत सोनार, सिव्हिल इंजिनिअर दत्तात्रय चिल्लरगे, डिस्टलरी इन्चार्ज प्रकाश साळुंके, हेड टाईमकिपर वसुदेव शिंदे यांच्यासह सर्व खातेप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार, सुरक्षा रक्षक उपस्थित होते. बॉयलर अग्नी प्रदीपन समारंभ कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सरपंच रविकिरण देशमुख यांनी केले. तर उपस्थितांचे आभार अंबासाखरचे संचालक राजेभाऊ औताडे यांनी मानले. यावेळी उपस्थितांना चहापान करण्यात आले. तर चेअरमन आडसकर व व्हाईस चेअरमन पाटील यांच्यासह सर्व सन्माननीय संचालकांनी उपस्थित सर्वांच्या भेटी घेऊन त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी करून संवाद साधला.

◆ पान १ वरून पुढे...

## 'शेतीला नोकरीचा...

करतात, त्यांना महिन्याला १० हजार रुपये पगार सुरू करा. जर हा पगार दिला, तर बेरोजगार मुले शेतात तरी कामे करतील. मुलांना शेतीची कामे करायची सवय लागेल. पगारामुळे ते शेतात काम करू लागतील. यावेळी जरांगे पाटील यांनी, कोणाला शेतीची १० हजार रुपयांची नोकरी पाहिजे? असा प्रश्न विचारताच, उपस्थितांपैकी अनेकांनी हात उंचावून प्रतिसाद दिला. शेतकऱ्यांसाठी या विविध मागण्या करताना, मनोज जरांगे पाटील यांनी शेतकऱ्यांनी शेती विकू नये, असे आवाहनही केले. दरम्यान गेल्या महिन्यात मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईमध्ये मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे या मागणीसह विविध मागण्या केल्या होत्या. त्यावेळी सरकारने जरांगे पाटील यांच्या काही मागण्या मान्य करत काही मागण्या पूर्ण करण्यासाठी मुदत मागितली होती. त्या मागण्यांचा जरांगे पाटील यांनी आज पुन्हा उल्लेख केला.

## जातीयवाद, धर्मवादाचे....

खासदार डॉ. प्रीतम मुंडे, माजी मंत्री तथा राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर, आर्यन पालवे आदींची उपस्थिती होती. तर मेळाव्याला आमदार नमिता मुंदडा, आमदार नारायण कुचे, आमदार संजय केणेकर आदींनीही आवर्जून उपस्थिती लावली होती. अतिवृष्टीग्रस्तांना मदतीचे आवाहन दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने राहायला शिका. तुमचा स्वाभिमान हाच माझा अभिमान आहे. तुम्ही माझ्या नावाने घोषणा दिल्याने मोठे होणार नाहीत... भगवान बाबांनी सुरू केलेले सीमोल्लंघन समाजघटकाच्या गर्दीने यशस्वी करून दाखवले आहे. अतिवृष्टीमुळे अडचणीत सापडलेल्या प्रत्येकाला त्याची जात-धर्म न पाहता मदत करावी, सौहार्दता जपावी, असे आवाहनही पंकजा मुंडे यांनी केले.

## साहेब गेल्यानंतर...

◆ पान १ वरून पुढे...

असा निर्णय घेतला गेला. मी आज फे आमदार आहे, मात्र माझी बहीण मंत्रीमंडळात आहे. शेतकऱ्यांसाठी जास्तीत जास्त मदत ताई मिळवून देतील, यावर मला पूर्ण विश्वास आहे, असे ते म्हणाले. मी बरेच दिवस बोललो नाही भावनिक होत मुंडे म्हणाले की, मी बरेच दिवस बोललो नाही. खामोश रहेना ठीक. पण आज डोळ्यांत पाणी येतंय. मुंडे साहेबांच्या हाताला धरून भगवानगडावर मेळाव्याला जायचो. साहेब गेल्यानंतर बहिणीने ही परंपरा पुढे चालवली, याचा मला अभिमान आहे.

## नाथ भक्तांनी...

बबन महाराज भैरवाल मच्छिंद्रनाथ देवस्थानचे अध्यक्ष सचिव विश्वस्त माजी आमदार साहेबराव दरेकर, अ.भा.किसान संघाचे नीलेश चिपाडे,विश्वस्त ताठे आदि उपस्थित होते.. या नियोजित भव्य दिव्य नाथ समाधी मंदिराचे बांधकाम देगलूर परिसरातील उच्च दर्जाचा दगड वापरण्यात येणार आहे .. हा शीलारोहनाचा कार्यक्रम संत,महंतांच्या उपस्थितीत संपन्न झाला.. यावेळी दानशूर नाथ भाविक भक्तांनी या मंदिराच्या कामासाठी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले आहे. यावेळी बोलताना आ.धस यांनी या मंदिर बांधकामाचा अपेक्षित कालावधी साडेतीन वर्ष एवढा असून या संपूर्ण दगडी बांधकाम असलेल्या मंदिराच्या उभारणीसाठी सुमारे ७२ कोटी रूपये इतका खर्च अपेक्षित असून मंदिरासाठी लागणारे दगड देगलूरहुन आणले जात असल्याचे सांगितले.त्याला घडवणे व बसविणे याची किंमत गृहीत धरून या शिलेचा आकार आणि किंमत वेगळी राहणार असून भाविक भक्तांनी या प्रति शीला संख्या निश्चित करून आपला सहभाग नोंदवावा याविषयीची अधिक माहिती लवकरच जाहीर करण्यात येईल असे सांगत आत्तापर्यंत काही भक्तांनी हजारो सिमेंटच्या गोण्या, तर काहींनी लाखो रुपयांची देणगी देऊन सहकार्य केले आहे केले आहे. या मंदिराचा पाया १००ु१५० फूट एवढा असून, १०९ फूट उंच कळसावर नाथ संप्रदायाचा भगवा ध्वज फडकणार असून या कामासाठी नाथभक्तांनी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन सुरेश धस यांनी केले आहे.

## लाडक्या बहिणींची...

कमी केले. त्यानंतरही या योजनेसाठी मोठ्या प्रमाणात निधी लागत असल्यामुळे या योजनेसाठी पात्र महिलांनी केवायसी करून घ्यावी, असा निर्णय घेतला. मात्र हा निर्णय घेतल्यापासून आजपयरत केवायसीची वेबसाईट बंदच आहे. त्यामुळे महिलांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे.

## कपिलधारवाडी च्या....

विद्यार्थ्यांना, दिवस व रात्र आजच्या घडीला श्री. मन्मथ स्वामी देवस्थान, कपिलधार या ठिकाणी वास्तव्य करावी लागत आहे. त्यामुळे ग्रामस्थांना कायमस्वरूपी दिलासा देणे व तातडीने पुनर्वसन होणे आवश्यक आहे. यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. जसे की, १) कपिलधारवाडी गाव तातडीने धोकाग्रस्त क्षेत्र घोषित करावे २) प्रभावित सर्व कुटुंबाचे तातडीने स्थलांतर व पुनर्वसन व्यवस्था करावी ३) कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी नवीन जागा व निवासी योजना जाहीर करून तात्काळ अंमलबजावणी व्हावी ४) शाळा व सार्वजनिक इमारतीची सुरक्षा तपासून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची पर्यायी व्यवस्था करावी ५) या सर्व कामांसाठी आपत्ती निवारण निधी नरेगा व पुनर्वसन विभागाचा निधी तथा इतर योजनेमधून निधी मंजूर करून ग्रामस्थांना यथोचित सहकार्य व्हावे अशा विविध मागण्यांचे पत्र आ. संदीप क्षीरसागर यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री मा.ना.अजितदादा पवार, मदत व पुनर्वसन विभागाचे मंत्री मा.ना.मकरंद जाधव पाटील, आपत्ती विभाग मंत्री मा.ना.गिरीश महाजन यांच्यासह महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर, जिल्हाधिकारी, बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी जिल्हा आपत्ती व व्यवस्थापन, बीड, उपविभागीय अधिकारी बीड, तहसीलदार बीड, गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड यांना पत्रव्यवहाराद्वारे केली आहे. कपिलधारवाडी च्या ग्रामस्थांच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था करावी- बीड विधानसभा मतदारसंघातील ग्रामपंचायत मौजे पाली अंतर्गत असलेले कपिलधारवाडी हे अंदाजे ९० कुटुंबांचे रहिवाशी गाव वसलेले आहे. सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने व यापूर्वी देखील संरक्षण भिंत,रस्ता व इतर व्यवस्थेला धोका निर्माण झाल्याने सन २०२२-२३ ते आजतागायत याविषयी आ. संदीप क्षीरसागर यांनी सातत्याने यथोचित पत्र व्यवहार व उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी करत आहेत. त्यातच ३० सप्टेंबर २०२५ रोजी रात्री उशिरा रस्ता,शाळा खोली, डोंगराचा काही भाग, घरांना मोठ्या प्रमाणात तडे जाण्याचे काम झाले आहे. त्या तळ्याचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. अशावेळी ग्रामस्थांना शासन व प्रशासन यांच्याकडून सर्वरित्या सहकार्य होणे गरजेचे असून याबाबत उचित कार्यवाही सुरू आहे. सर्व कुटुंबाची तात्पुरती व्यवस्था श्री. मन्मथ स्वामी देवस्थान, कपिलधार येथे होणे आवश्यक आहे. प्रशासनाने पंच कमिटी श्री. कपिलधार यांना याबाबतीत अवगत करावे. जेणेकरून पंच कमिटी कडून गावकऱ्यांना याबाबतीत यथोचित सहकार्य होईल व त्याचबरोबर ग्रामस्थांच्या हाताला काम, विद्यार्थ्यांना शाळा व भोजन व्यवस्था होईल. याबाबत प्रशासनाकडून आदेश काढण्यात यावेत.

## तलवाड्यात घडली...

हळहळ आणि धक्क्याचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, मृत अमोल सोबतच चार महिन्यांच्या बालकाचे तलवाडा प्राथमिक अरोग्य केंद्रात शवविच्छेदनासाठी आणले होते. घटनेची माहिती समजताच तलवाडा ठाण्याचे सपोनि मनोज निलंगेकर, पोलिस उपनिरीक्षक. कैलास अनालदास, बीट अंमलदार पो.ह. शेख मोहसिन, पो.ह. नारायण काकडे तसेच चालक पवन शेळके यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

◆ पान ४ वरून पुढे...

## नियम बाहय....

लोकशाही प्रधान देशात पाच वेळेस अर्ज देऊन सुद्धा भ्रष्ट कर्मचारी यांना पाठीशी घालत आहेत यावरून दिसुन येते. सर्व सामान्य माणसाचे कोणीच एकुण घेत नाही यावरुन दिसुन येते. कर्मचारी वर्गाला भरमसाठ पगार असतांना शासनाच्या निधीवर लुटमार करतात, ही बाब खेद जनक आहे. विस्तार अधिकारी गायकवाड साहेब यांनी जर इन कॅमेरा चौकशी केली नाही तर मी गावकऱ्यांना सोबत घेऊन पंचायत समिती माजलगाव या कार्यालयासमोर दि.१३/१०/२०२५ रोजीअमरण उपोषण करणार आहे असे दि.३०/०९/२०२५ रोजी दिलेल्या अर्जात अशोक महादेव मोरे यांनी निवेदन देऊन कळवले आहे.

## पद्माक्षी'तर्फे...

नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि स्थानिक व्यावसायिकांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## माजलगावात शिवरत्न ...

असणार आहे. दि. ९ ऑक्टोबरला होणा-या या जयंती उत्सवात समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन नाभिक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे, जिल्हा उपाध्यक्ष किशोर दळवी, सुनिल दळवी, सतिष राउत, सागर दळवी, हनुमंत राउत, गोविंद दळवी, वैभव शिंदे, रोहित दळवी, संतोष शिंदे, नागेश खटले, रामकिसन वाघमारे, बाळासाहेब बहिरे यांचेसह महाराष्ट्र नाभिक महामंडळ, बीड जिल्हा व समस्त नाभिक समाज माजलगावच्या वतीने करण्यात आले आहे.

## करुणा-मैत्रीच्या....

बीड तालुक्यातील महाविहार धम्मभूमी डॉ. भदंत आनंद कौसल्यायन नगर, शिवणी ता. जि. बीड येथे गुरुवार दि. २ ऑक्टोबर रोजी ६९ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने अखिल भारतीय सहावी बौद्ध धम्मपरिषद पार पडली. सदरील धम्मपरिषद प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेकडून आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी उदघाटक भदंत डॉ. खेमधम्मो महाथेरो बोलत होते. या धम्मपरिषदेला संस्थेचे सचिव तथा धम्मपरिषदेचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशील थेरो, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भदंत डॉ. इंदवंस्स महाथेरो, प्रमुख मार्गदर्शक भिक्खु उपगुप्त महाथेरो, प्रमुख अतिथी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, एसपी नवनीत कॉवत, समाज कल्याण आयुक्त प्रदिप भोगले, समाज कल्याण आयुक्त रविंद्र शिंदे, समाज कल्याण सहसंचालक डी. बी. क्षीरसागर, उपायुक्त उमेश सोनवणे, शास्त्रज्ञ डॉ. सिध्दार्थ जोंधळे, प्रमुख धम्मदेसना भिक्खु पय्यातीस महाथेरो, भिक्खु महाविरो थेरो, भिक्खु नागसेन, भिक्खु धम्मघोष, भिक्खु चंद्रमुनी, भिक्खु धम्मप्रिय, भिक्खु पय्यावर्धन, भन्ते बुद्धबोधी आदींची उपस्थिती होती. पुढे धम्मदेसना देताना भदंत डॉ. खेमधम्मो महाथेरो म्हणाले की, गौतम बुद्धांच्या शिकवणीमुळे समाजातील अंधश्रद्धा, भेदभाव आणि असमानता यांना जबर धक्का बसला. म्हणूनच विज्ञानावर आधारलेला बौद्ध धम्म आज जागतिक पातळीवर स्वीकारला जात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे आपल्याला बौद्ध धम्माची दीक्षा देवून उद्धार केला आहे. त्या धम्म प्रवर्तन दिनाला आज ६९ वर्षे पूर्ण होत आहेत. तसेच भिक्खु धम्मशील थेरो यांच्या संयोजनातून ही धम्मपरिषद होत असून ही बाब गौरवास्पद आहे. त्यामुळे बौद्ध धम्माचा प्रसार आणि प्रचार अधिक गतीने होण्यास मदत होत आहे. असे विचार त्यांनी व्यक्त केले. या धम्मपरिषदेचे प्रस्ताविक डॉ. नामदेव शिनगारे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अशोक गायकवाड यांनी तर आभार गुलाबराव भोले यांनी मानले. अखिल भारतीय सहाव्या बौद्ध धम्मपरिषदेला जनसमुदाय लोटला होता. दरम्यान शाहीर प्रा. दीपक जमदाडे यांचा भिम व बुद्ध गीतांचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. तसेच संविधान ग्रुपकडून दोनशे संविधान प्रति वाटप करण्यात आल्या होत्या.ही धम्मपरिषद यशस्वीपणे पार पडण्यासाठी प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेकडून अतिशय देखणे नियोजन करण्यात आले होते.

## नैसर्गिक आपत्तीवर....

तालुक्यातील मौजे परचुंडी, भिलेगाव, मलनाथपूर, सेलू तर अंबाजोगाई तालुक्यातील राक्षसवाडी येथे अतिवृष्टीग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना जीवनावश्यक किराणा किटचे वितरण करण्यात आले. मोतीलाल ओसवाल फाउंडेशन आणि बोरोसील रिन्यूबल्स यांच्या सहकार्यातून ग्लोबल विकास ट्रस्टकडून हा उपक्रम राबवण्यात आला याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास रामदेवजी अग्रवाल, सुनीताजी अग्रवाल, सुनील जीवराजका, कुशमा जिवराजका, अनिल चंदाराणा, डॉ.हरिश्चंद्र वंगे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार बाबुराव रूपनर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. अतिवृष्टीग्रस्त तसेच पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळी व दसरा आनंदात साजरा करता यावा यासाठी ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांच्या पुढाकारातून शेतकरी कुटुंबांना अन्नधान्य आणि किराणा किटचे वितरण करण्यात येत आहे. परळी आणि अंबाजोगाई तालुक्यातील १६ गावांमध्ये जाऊन ३ हजार कुटुंबांना ही मदत देण्यात येणार आहे. काही गावांत झालेल्या मदत वितरण कार्यक्रमात पुढे बोलतांना जलनायक मयंक गांधी म्हणाले की, शेतकऱ्यांनी गटातटात किंवा जातीजातीत विभक्त होऊन चालणार नाही. शेतकऱ्यांवर येणाऱ्या आपत्ती, त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करायचे असेल तर हाती हात घेऊन शेतकरी म्हणून एकत्र राहण्याचा हा काळ असल्याचे त्यांनी म्हटले. ऐन दसरा आणि दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या वाट्याला आलेले दुःख फार मोठे आहे. अगोदरच कर्जाच्या खाईत सापडलेला बळीराजा दिवाळीचा सण कसा साजरा करणार? असा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर उभा टाकल्याचे लक्षात घेऊन जलनायक मयंक गांधी यांच्या ग्लोबल विकास ट्रस्टने मदतीचा हात पुढे केला आहे. शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत, अनेक समस्या आहेत, त्यातच आलेले नैसर्गिक संकट हे मोठे असून अशा खडतर काळात सर्वांनी एकोप्याने राहून एकमेकांना मदतीचा हात दिला पाहिजे असे मत कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.. परळी वैजनाथ तालुक्यातील परचुंडी, सेलू आणि मलनाथपूर, भिलेगाव तसेच अंबाजोगाई तालुक्यातील राक्षसवाडी येथील नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यात आला. याप्रसंगी प्रत्येक गावातील महिला व पुरुष शेतकऱ्यांनी समोर येत त्यांच्या भावना व्यक्त केल्या. =८१६ गावे आणि ३ हजार कुटुंबांना मदत!- ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात परळी आणि अंबाजोगाई तालुक्यात जोरदार पाऊस झाला. या पावसाने नद्या - नाले एक होऊन प्रचंड मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक गावांत महापूर आल्याने नदीकाठी असलेल्या शेतजमीनी व त्यावरील पिके, काही शेतकऱ्यांची जनावरे, शेती उपयोगी साहित्य वाहून गेल्याने त्यांना मदतीचा हात मिळणे आवश्यक होते. ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने १६ गावांतील नुकसानग्रस्त जवळपास ३ हजार कुटुंबांना २२ जीवनावश्यक वस्तूंची दीड महिना पुरेल एवढी परिपूर्ण किराणा किट मदत म्हणून देण्यात येत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात...

### संस्कारमध्ये महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती संपन्न



बीड । प्रतिनिधी

येथील संस्कार विद्यालयात महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती निमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर माध्यमिक विभागाचे नवनियुक्त सन्माननीय मु.अ. श्रीयुत. व्ही. डी. जोशीसर, प्राथमिक विभागाच्या सन्माननीय मु .अ. श्रीमती .शोभाताई कुलकर्णी आणि संस्कार विद्यालयाचे नवनियुक्त कार्यकारी अधिकारी श्रीयुत. राजहंससर तसेच प्रमुख वक्त्या श्रीमती खवले व्ही .एम .व श्रीमती वर्षाताई डोळस उपस्थित होत्या. या सर्व मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती, महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी विशेष वक्त्या श्रीमती वर्षाताई डोळस यांनी महात्मा गांधींच्या जीवन कार्यावर ,त्यांच्या विचारावर आपल्या भावना व्यक्त करून गांधीजींचा सत्याग्रहाचा मार्ग, अहिंसेचा मार्ग भारतीय स्वातंत्र्याला कसा उपयोगी ठरला हे सर्वांना पटवून दिले. तसेच श्रीमती खवले यांनी लालबहादूर शास्त्री यांच्या बद्दल आपले विचार व्यक्त केले. प्रधानमंत्री असतानादेखील साधी राहणी उच्च विचारसरणी या शास्त्रींच्या विशेष गुणाबद्दल तसेच आपल्या कार्याबद्दल असणारा शास्त्रीजींचा प्रामाणिकपणा. त्यासोबतच भारत -पाक युद्धावेळी शास्त्रींनी घेतलेली कणखर भूमिका स्पष्ट करून मूर्ती लहान ;पण कीर्ती महान. हे वाक्य शास्त्री बद्दल किती संयुक्तीक ठरते ते श्रोत्यांना पटवून दिले. या कार्यक्रमानंतर लगेचच नवनिर्वाचित मुख्याध्यापक व्ही डी जोशी सर व नवनिर्वाचित मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीयुत राजहंस सर यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी कार्यक्रमाचे संचलन श्रीमती डोईफोडे ए. आर. यांनी केले तर श्रीमती प्रतीक्षा वाघ यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रम संपन्न झाला.

### सौ.के.एस.के.महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी



बीड । प्रतिनिधी

येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री या दोन्ही महापुरूषांच्या जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आपले मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की, महात्मा गांधी यांनी महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधुन महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना व एन.सी.सी. विभागाच्या वतीने महाविद्यालयातील परीसराची स्वच्छता करण्यात आली.या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे,पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर कर्मचारी प्रतिनिधी श्री इमाद सर ,एनएनएस कार्यक्रमाधिकारी डॉ. यादव घोडके ,एनसीसीचे कॅप्टन डॉ.बालासाहेब पोटे,प्रा. जयंत साठे, प्रा. डॉ. मंडलीक , प्रा. प्रदीप साळुंके, प्रा. दयानंद सरपते, डॉ. पद्माकर ससाणे, डॉ. नागेश शेटे, प्रा. मिलींद निर्सगंध, प्रा. पावरा, प्रा. वैशाली काशीद तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आदी उपस्थित होते.

### निपुण महाराष्ट्र उपक्रमांतर्गत माजगाव केंद्रास्तरीय रंगभरण व अभिव्यक्ती स्पर्धा वडगाव येथे संपन्न

वडगाव शाळेची चमकदार कामगिरी



बीड । प्रतिनिधी

निपुण महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव येथे माजगाव केंद्रस्तरीय रंगभरण व अभिव्यक्ती स्पर्धा संपन्न झाल्या.या स्पर्धेसाठी केंद्राचे केंद्र प्रमुख मा.जे.पी.परदेशी ,शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ.राजश्री जांभुळकर, मुख्याध्यापक श्री.सुभाष राठोड यांची उपस्थिती होती.यावेळी प्रत्येक शाळेतून प्रत्येक इयत्तेच्या दोन याप्रमाणे केंद्रातील७२ विद्यार्थी सहभागी झाले होते. यात वडगाव शाळेने सर्वात जास्त बक्षीस मिळवत आपला गुणवतेचा झेंडा फडकवला आहे. सर्वच शाळेतील विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.या स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी संतोष साळुंखे, रवी राठोड, संतोष गारगोटे, विकास शेळके, वैजनाथ जाधव, मयुरी धायगुडे, लता मोरे, अर्चना शेलार, मनीषा पाटील, सुरेश मांडे, भूषण पिंगळे आदी शिक्षकांनी मेहनत घेतली.

### अंबादास घाटूळ (दादा) यांचे वृद्धापकाळाने निधन



तलवाड़ा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील गोदाकाठी असलेल्या मौजे काठोडा येथील रहिवासी असलेले अंबादास नाथाजी घाटूळ (दादा) (वय ९० वर्षे) यांचे वृद्धापकाळाने राहत्या घरी गुरूवारी रात्री निधन झाले असून काठोडा येथील स्मशानभूमीत शुक्रवारी सकाळी १०:३० वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. खंडू घाटूळ व दत्ता घाटूळ यांचे वडील आणि अंकुशराव नाथाजी, जालिंदरराव नाथाजी व बप्पासाहेब नाथाजी घाटूळ यांचे ते ज्येष्ठ बंधू होते. दादा या नावाने सर्वपरिचित असलेले अंबादास घाटूळ हे अतिशय संयमी व सुस्वाभावी होते. त्यांच्या पश्चात तीन भाऊ, दोन बहिणी, पुतणे, पत्नी, दोन मुले, चार मुली, जावाई, सुना, नातवंडे-पतवंडे आहे.

# सायबर फसवणूक झाल्यास विनाविलंब तक्रार द्या : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**• सायबर फसवणूक तक्रारीसाठी 'गोल्डन अवर' महत्वाचा**

मुंबई । प्रतिनिधी

रस्ता अपघातामध्ये ज्या पद्धतीने ' गोल्डन अवर'मध्ये उपचार मिळाल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचू शकतात. त्याच पद्धतीने सायबर फसवणुकीमध्येही 'गोल्डन अवर' महत्वाचा आहे. जेवढी विनाविलंब तक्रार द्याल, तेवढी फसवणूक झालेली रक्कम वाचविणे आणि परत मिळविणे सोयीचे होते. त्यामुळे सायबर फसवणूक झाल्याचे समजल्यास तातडीने



विनाविलंब १९३० किंवा १९४५ या हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार द्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

'सायबर जनजागृती' माह ऑक्टोबर २०२५ कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्र पोलीस मुख्यालय येथे झाले. यावेळी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंह चहल, अभिनेता अक्षय कुमार, अभिनेत्री राणी मुखर्जी, व्हीजेटीआयचे डॉ. फारूक काझी, 'आयआयटी' मुंबईचे प्रा. मंजेश हनवाल यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला म्हणाल्या की, नागरिकांना सजग ठेवण्यासाठी आणि त्यांचे त्वरित संरक्षण करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने उल्लेखनीय जनजागृती मोहीम सुरू केली आहे. देशातील प्रत्येक मोठ्या रेल्वे स्थानकावर दररोज सायबर सुरक्षा सूचना दिल्या जात आहेत. लाखो नागरिक हे संदेश दररोज त्यांच्या दैनंदिन जीवनात ऐकत आहेत. राज्य पोलीस यंत्रणाही जनजागृतीची गरज ओळखून महाराष्ट्रातील सर्व शहरांमध्ये, जिल्ह्यांमध्ये आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सखोल जनजागृती मोहीम राबवत आहे. यावेळी सायबर सुरक्षा विषयक माहितीपट दाखविण्यात आला. तसेच 'सायबर योद्धा' या लहान मुलांसाठीच्या कॉमिक बुकलेटचे प्रकाशन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच यावेळी सायबर यावेळी जनजागृतीसाठी काम करणाऱ्या सायबर वॉरियरचा सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. विशेष पोलीस महानिरीक्षक यशस्वी यादव यांनी आभार मानले.

## नमो ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून संत परंपरेचा नवा अध्याय : विष्णुदास महाराज सुरवसे

**• श्रीक्षेत्र चारदरीत भावार्थरामायण ग्रंथवाटपाचा भव्य शुभारंभ**

धारूर । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त, देशभरात नमो सेवा पंधरवाडा या सेवाभावी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, त्याच पवित्र कार्याचे औचित्य साधून श्रीराम भक्त विष्णुदास महाराज सुरवसे भावार्थ रामायण सेवा मंडळ व अध्यात्मिक समन्वय आघाडी यांच्या संयुक्त



विद्यमाने नमो ग्रंथोत्सव हा एक अद्वितीय आणि अध्यात्मिक उपक्रम बीड जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत, बीड जिल्ह्यातील प्रत्येक गावातील हनुमान मंदिरामध्ये संतश्रेष्ठ श्री एकनाथ महाराज कृत भावार्थरामायण ग्रंथाचे पूजनपूर्वक आणि सन्मानपूर्वक वाटप करण्याचे भव्य अभियान राबवले जात आहे. या दिव्य उपक्रमाचा शुभारंभ मंगळवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता धारूर तालुक्यातील श्रीक्षेत्र चारदरी येथील हनुमान मंदिरात करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, व श्रीराम भक्त तथा भावार्थ रामायण सेवा मंडळाचे अध्यक्ष विष्णुदास महाराज सुरवसे यांच्या शुभहस्ते ग्रंथ भेट देऊन या पवित्र मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. या वेळी गावातील शेकडो रामभक्तांसह भाविक, कीर्तनकार, साधु संत, महिला भगिनी, तरुण वर्ग आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संपूर्ण वातावरण हे श्रीराम मय व नामस्मरणाच्या गजरात भारले होते.



,माजलगाव लोकनेते सुंदर रावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि.सुंदरनगर तेलगाव कार्यालयात २ ऑक्टोंबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती साजरी करनेत आली...प्रतीमेस विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड, दासराव मोरे, महादेव मुरकुटे

## सोन्याविना यावर्षीचे सीमोल्लंघन

**दरवाढीमुळे ग्राहकांची पाठ, वाहन व वास्तुखरेदीकडे वाढला कल**

पिंपळनेर । प्रतिनिधी

साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या दसऱ्यानिमित्त गुरुवारी पिंपळनेरसह,बीड तालुक्यात ग्राहकांनी दणक्यात खरेदी केली. यात वाहने आणि घरांच्या खरेदीचे तसेच ताबा घेणे वास्तुशांती आदींसह हा सण जल्लोषात साजरा केला. सोन्या-चांदीचे दर वाढले असल्याने यंदा मात्र ग्राहकांनी याकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले. दसरा हा शुभमुहूर्त मानला जाणारा सण असून या दिवशी सोने, चांदी, वाहन आणि घर खरेदी करण्याची परंपरा अनेक वर्षांपासून रूढ आहे. मात्र, यावर्षी दसऱ्यात सोने दराने विक्रमी उसळी घेत प्रति तोळा १ लाख २० हजारांच्या वर पोहोचल्यामुळे ग्राहकांनी सोने खरेदीकडे पाठ फिरवली . परिणामी सराफा बाजारात अपेक्षित गर्दी दिसून आली नाही. असे सराफा दुकानदारांनी सांगितले की, मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी दसऱ्याच्या दिवशी विक्रीत तब्बल ३० ते ४० टक्क्यांनी घट आली आहे.

सोने - चांदी खरेदी करणे कठीण आहे. तसेच सोने घेऊन ते सांभाळणे म्हणजे महाकठीण आहे. त्यापेक्षा कार घेणे किंवा घरात गुंतवणूक करणे अधिक फायदेशीर वाटतेय, अशी प्रतिक्रिया सचिन ठोकरे या ग्राहकाने दिली आहे. तर उमेश बन म्हणाले, दसरा हा शुभ दिवस असून यंदा आम्ही नवीन दुचाकी घेतली. ऑफर्स आणि कमी व्याजदरामुळे ही योग्य वेळ वाटली.

## विद्यार्थ्यांनी औद्योगिक कौशल्ये आत्मसात करावीत : मा.प्रदीप कुलकर्णी



चौसाळा । प्रतिनिधी

भारत हा कृषिप्रधान देश आहे. अन्नप्रक्रिया उद्योगाला आपल्याकडे भरपूर संधी आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील तरुणांनी आपल्याकडे जे पिकते त्यांच्यावर प्रक्रिया उद्योग उभा करावेत असे आवाहन प्रसिद्ध सेंद्रिय गुळ उद्योजक तथा शेतीनिष्ठ शेतकरी श्री. प्रदीप कुलकर्णी यांनी केले. कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे अर्थशास्त्र विभागातर्फे उद्योजगता विकास या विषयावर व्याखान आयोजित केले होते. पुढे बोलताना श्री. कुलकर्णी म्हणाले की, कृषी उद्योग उभारणीसाठी खूप अडचणी आहेत,आपल्या तरुणांना विक्रीचे ज्ञान नसते ,त्यामुळे औद्योगिक कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे.अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ. पंडित खाकरे म्हणाले की, ग्रामीण भागातील तरुणांनी जे विकते ते पिकवणे गरजेचे असून रासायनिक खत व औषधाचा वापर मर्यादितच करावा. सूत्रसंचलन प्रा.सुधीर माने यांनी केले. तर आभार प्रा.सुर्यकांत देशमुख यांनी व्यक्त केले.

## अभिजात मराठी भाषा हे मराठी समाजाच्या अभिमानाचे प्रतीक: प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळून आज एक वर्ष पुर्ण झाले. अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही बाब मराठी भाषक समाजासाठी अभिमानाचे प्रतिक आहे. या दर्जामुळे मराठी भाषेचा समृध्द वारसा नव्याने सबंध जगासमोर येईल. जुन्या दुर्मिळ मौलिक साहित्याचे आणि संस्कृतीचे यानिमित्ताने पुन्हा नव्याने पुनरुज्जीवन होईल आणि मराठी भाषेचा सर्वांगिण विकास होईल असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी केले. सौ. के.एस.के. महाविद्यालयात



मराठी विभागाच्या वतीने दि. ०३ आक्टोंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या अभिजात मराठी भाषा दिन व सप्ताह उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ. अन्सरउल्ला खान आदिंची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी मराठी भाषक समाजाने तब्बल दहा वर्ष संघर्ष केला. यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीने मराठी भाषेतील उपलब्ध दुर्मिळ पुरावे राज्य आणि केंद्र सरकारकडे दाखल करुन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी आग्रह धरला. यातून मराठी भाषेला एक वर्षापुर्वी अभिजात भाषेचा दर्जा देवून गौरविण्यात आले. मराठी भाषेला सुमारे दोन हजार वर्षांचा प्रदीर्घ इतिहास असून यातील ग्रंथ संपदा अतिशय आणि दुर्मिळ आणि मौलिक स्वरुपाची आहे. यामुळे मराठी भाषेची आणि मराठी समाजाची संस्कृती किती समृध्द होती हे लक्षात येते. मराठी भाषेचे हे वैभव आपण सर्व मराठी भाषक समाजाने जपणे आणि त्याचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

## महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांना जयंती निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये अभिवादन



बीड । प्रतिनिधी

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये सत्य,अहिंसा आणि सत्याग्रहाचे उद्गाते महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी, माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शालेय परिसरातून विद्यार्थ्यांच्या प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते.

# अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची 4 ते 6 ऑक्टोबर दरम्यान अंतिम विशेष फेरी

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात अतिवृष्टी व पूर परिस्थिती निर्माण झाली होती. ही परिस्थिती तसेच विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर आणि शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या ३० सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देश यांचा विचार करुन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयामार्फत विद्यार्थ्यांना अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची शेवटची संधी देण्यात येत आहे. ४ ते ६ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या या अंतिम फेरीची विद्यार्थी, पालक तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन शिक्षण संचालक (माध्यमिक) डॉ. महेश पालकर यांनी केले आहे.

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून राज्यामध्ये इयत्ता अकरावीचे प्रवेश केंद्रिय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहेत. अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या आतापर्यंत १० फेऱ्या राबविण्यात आलेल्या आहेत. अंतिम विशेष फेरीची सर्वसाधारण वैशिष्ट्ये- ४ ऑक्टोबर सकाळी १० वाजेपासून ते ६ ऑक्टोबर दुपारी ३ वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना नवीन नोंदणीसह प्राधान्यक्रम भरणे, तसेच प्राधान्यक्रमात बदल करता येणार आहे. या फेरीमध्ये अर्ज भरताना विकल्प भरण्याची व नोंदणीची सुविधा अंतिमतः देण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी या फेरीमध्ये विकल्प भरले आहेत त्यांच्या प्राधान्यक्रम / विकल्पानुसार कनिष्ठ महाविद्यालय न मिळाल्यास केवळ अशा विद्यार्थ्यांना पुनश्चः रिक्त जागा दर्शवून रिक्त असलेल्या जागा विचारात घेऊन विकल्पात बदल करण्याची सुविधा देण्यात येणार आहे. या बदल केलेल्या विकल्पानुसार कनिष्ठ महाविद्यालय गुणानुक्रमे देण्यात येईल. ज्या विद्यार्थ्यांनी विकल्प नोंदविला नाही त्यांना त्या स्तरावर गुणानुक्रमे महाविद्यालयाची अलॉटमेंट करण्यात येणार नाही. तद्नंतरही गुणानुक्रमे कनिष्ठ महाविद्यालय न मिळाल्यास अशा विद्यार्थ्यांना पुनःश्च विकल्प नोंदविण्याची सुविधा देण्यात येणार आहे. या बदल केलेल्या विकल्पानुसार कनिष्ठ महाविद्यालय गुणानुक्रमे देण्यात येईल. उपरोक्त पद्धतीने कनिष्ठ महाविद्यालय अलॉट न होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक अलॉटमेंटनंतर विकल्प बदलण्याची सुविधा शेवटच्या विद्यार्थ्यास महाविद्यालय अलॉटमेंट होईपर्यंत देण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना अलॉटमेंटच्या टप्प्यावर महाविद्यालयाची अलॉटमेंट झाल्यास त्यांना पुनःश्च विकल्प भरता येणार नाही. तसेच विकल्प बदलावयाच्या वेळी एसएमएस/ संकेतस्थळावर पाठवण्यात येईल. प्रत्येक स्तरावर विकल्प न बदलल्यास विद्यार्थ्यांस प्रवेश घ्यावयाचा नाही असे समजून प्रवेश प्रक्रियेतील त्या टप्प्यावर विद्यार्थ्यांचा विचार प्रवेशाकरीता केला जाणार नाही. उपरोक्त टप्पे पूर्ण झाल्यानंतर एकाच वेळी गुणानुक्रमे विद्यार्थ्यांची अलॉटमेंट करण्यात येणार आहे. तद्नंतर प्रत्यक्षात कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन प्रवेश घेण्याचे वेळापत्रक दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ नंतर देण्यात येईल. त्या दरम्यान प्रवेश करणे आवश्यक असेल.

अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची ही अंतिम फेरी असून यानंतर संधी मिळणार नाही. अधिक माहितीसाठी मंडळाचे अधिकृत पोर्टल- https://mahafyjcadmissions.in ला भेट द्यावी अथवा ई-मेल आयडी- supportmahafyjcadmissions.in किंवा हेल्पलाईन नंबर ८५३०९५५५६४ वर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य शिक्षण संचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. ०४ ऑक्टोबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### जिल्हाधिकारी यांच्या हस्ते १९१ गट क व ड पदाच्या उमेदवारांना नियुक्तीपत्र वितरीत करण्यात येणार

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने लिपिक टंकलेखक पदावरील नियुक्तीसाठी शिफारस केलेले उमेदवार तसेच नविन अनुकंपा धोरणानुसार गट क व गट ड मध्ये नियुक्त होणाऱ्या सर्व उमेदवारांना नियुक्तीपत्रे वितरणाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम दि.०४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नियोजन सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे आयोजीत करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान तसेच जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून लिपीक टंकलेखक पदासाठी शिफारस करण्यात आलेले एकूण ७७ उमेदवार तसेच नविन अनुकंपा धोरणानुसार गट क संवर्गातील एकूण ५१ उमेदवार तर गट ड संवर्गातील एकूण ६३ उमेदवारांना नियुक्तीपत्रे वितरीत करण्यात येणार असून या कार्यक्रमासाठी संबंधीत सर्व नियुक्ती प्राधिकारी आणि नियुक्त झालेले सर्व उमेदवार यांना उपस्थित राहणे आवश्यक आहे. तरी या कार्यक्रमासाठी सर्व कार्यालय प्रमुख तसेच सर्व संबंधीत उमेदवार यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### समाजमाध्यमांतून अतिवृष्टी यादीच्या चुकीच्या आफवांवर नागरिकांनी विश्वास न ठेवण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यामध्ये माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांचे शेतीपिक नुकसानीचे संयुक्त पंचनामे करण्याची कार्यवाही तालुका स्तरावर सुरू असून पंचनामे पूर्ण झाल्यानंतर शासनास निधी मागणी जिल्हा प्रशासनाच्या वतीने तात्काळ करण्यात येईल, याची आवश्यक खबरदारी प्रशासनाकडून घेण्यात येत आहे.दरम्यान समाजमाध्यमांवर बीड जिल्ह्यातील माहे सप्टेंबर, २०२५ मधील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या ३०४ गावांची यादी व्हायरल होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. सदर यादी प्रशासनामार्फत तयार केलेली नाही या यादीबाहेरील गावांमध्ये नुकसान झालेले नाही असा चुकीचा संदेश समाजमाध्यमांतून प्रसारित होत आहे. त्यामुळे याद्वारे सर्वसामान्य नागरिकांना स्पष्ट करण्यात येते की,व्हायरल होत असलेली यादी अधिकृत नसून प्रशासनाने ती जारी केलेली नाही. पंचनामे अद्याप सुरू असून नुकसानीबाबतची माहिती शासनास योग्य मार्गाने सादर केली जाईल. नागरिकांनी अशा प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. प्रशासनास सहकार्य करावे व केवळ अधिकृत माध्यमांद्वारेच माहितीचा स्वीकार करावा. जिल्हा प्रशासन नागरिकांच्या पाठीशी आहे व शेतकऱ्यांच्या नुकसानीसंदर्भात तातडीने योग्य कार्यवाही करण्यात येत असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

### महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) ९ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयामार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) २०२५ परीक्षेचे आयोजन रविवार दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्याचे नियोजित आहे. सदर परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कालावधी दि. १५ सप्टेंबर २०२५ ते दि. ०३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत होता. परंतु महाराष्ट्रात काही जिल्हयामध्ये अतिवृष्टी व पुरस्थिती निर्माण झाल्याने परीक्षार्थी/उमेदवारांना ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यास अडचणींना सामोरे जावे लागल्याने परीक्षार्थी/उमेदवारांना ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी दि. ०४ ऑक्टोबर २०२५ ते दि. ०९ ऑक्टोबर २०२५ रात्री ११:५९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच विद्यार्थी/उमेदवारांना तांत्रिक अडचणीमुळे परीक्षा शुल्क भरता न आल्यामुळे संबंधित परीक्षार्थी उमेदवारांना नेट बँकिंग/डेबिट कार्ड/क्रेडिट कार्ड द्वारे दि. ०९ ऑक्टोबर २०२५ रात्री ११:५९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ मिळणार नाही. संबंधित परीक्षार्थी/उमेदवारांनी याची नोंद घ्यावी असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे-०४ च्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### प्रेरणा लोकसंचलित साधन केंद्राची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळावा संपन्न

बीड । प्रतिनिधी

प्रेरणा लोकसंचलित साधन केंद्र, केजची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळावा दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी श्रीराम मंगल कार्यालय, रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ, केज येथे महिला व बाल विकास विभागांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ, नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्योग विकास प्रकल्प अंतर्गत प्रेरणा लोकसंचलित साधन केंद्राची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळावा सी.एम.आर.सी.च्या अध्यक्षा मंडाबाई पाटोळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्षा सिता बनसोड यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी महिला सक्षमीकरण व बालविवाह निर्मूलनाविषयी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. सभेस जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक किरण जाधव, विजय काकड, सखी वन स्टॉप सेंटरच्या शांता खांडेकर, आय.सी.आय.सी.आय बँकेचे महेश अंजान, बँक ऑफ महाराष्ट्राचे योगेश कांडले, माविम जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप, लेखा अधिकारी गजानन ढोणे, जिल्हा प्रकल्प सल्लागार सागर इंदुरकर, एम.आय.एस. सल्लागार नरेश कुरापाटी यांच्यासह सी.एम.आर.सी. पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व केज प्रेरणा महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या प्रतिनिधींची उपस्थिती होती. स्वागत व प्रस्तावना व्यवस्थापक रामकुवर आंधळे यांनी केली. वार्षिक अहवाल व लेखा परीक्षण अहवाल लेखा अधिकारी गजानन ढोणे यांनी सादर केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वंदना शिंदे यांनी केले.

### आंतरराष्ट्रीय लेख बुकिंग व दिवाळी फराळ पार्सल सेवा उपलब्ध

बीड । प्रतिनिधी

भारतीय डाक विभाग, बीड विभागामार्फत नागरिकांसाठी खालील सुविधा उपलब्ध करून देण्यात आले आहे. दिवाळी उत्सवानिमित्त नागरिकांना आपल्या परदेशात वास्तव्यास असलेल्या मित्र,नातेवाईकांना फराळ व इतर भेटवस्तू सुरक्षितरित्या पाठविण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध.पोस्ट ऑफिसमध्ये पार्सल पॅकेजिंगची सोय उपलब्ध करून देण्यात आली असून वाजवी दरात सुरक्षित पॅकेजिंग व जलद वितरणाची खात्री दिली जात आहे. परदेशात नोंदणीकृत पत्र, स्पीड पोस्ट (एचड) तसेच पार्सल पाठविण्याची सोय.नागरिकांनी आंतरराष्ट्रीय लेख बुकिंग करताना आधार / वैध ओळखपत्र व पूर्ण पत्ता नमूद करणे आवश्यक आहे.गंतव्य देशाच्या अटी व शर्तींचे पालन बंधनकारक आहे. नागरिकांनी या सेवांचा लाभ घ्यावा व आपल्या मित्र,नातेवाईकांना दिवाळीच्या शुभेच्छा पत्रासह फराळ पोहोचवावा, असे आवाहन भारतीय डाक विभाग बीड यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

# अखेर लिंबागणेश-बोरखेड रस्त्याची दुरुस्ती ; ग्रामस्थांच्या 'अजितदादांना दुग्धाभिषेक' आंदोलनाचे यश

लिंबागणेश । प्रतिनिधी



बीड तालुक्यातील लिंबागणेश शिवारातील लिंबागणेश-बोरखेड मार्ग वाहून गेल्याने घोलपवस्ती, वाणीवस्ती, ढवळेवस्ती, मुळेवस्ती व गावडेवस्ती येथील ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. दुध उत्पादक शेतकऱ्यांना दूध-दुभते, शेतीमाल वाहून नेण्यासाठी तसेच शालेय मुलांना शिक्षणासाठी, ग्रामस्थांना बाजारहाट व दवाखान्यासाठी अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत होता. जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींनी पाहणी करूनही फोटोसेशनपुरतेच मर्यादित राहून रस्त्याची दुरुस्ती होत नव्हती. ग्रामस्थांनी निवेदन, रास्तारोको आंदोलन केले तरी १५ दिवस प्रशासनाने दुर्लक्ष केले. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक घालत आंदोलन केले. या आंदोलनाची बातमी सोशल मीडियावर व प्रसारमाध्यमांत प्रचंड व्हायरल झाल्याने जिल्हा प्रशासन खडबडून जागे झाले. यानंतर लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत तातडीने बैठक घेऊन तात्पुरत्या स्वरूपात रस्ता दुरुस्तीचे काम सुरू केले. दुसऱ्याच दिवशी दळणवळण सुलभ झाल्याने शेतकरी व शालेय मुलांचे हाल थांबले. ग्रामस्थांनी या कामाबद्दल समाधान व्यक्त करून पालकमंत्री अजितदादा पवार, प्रसारमाध्यमे, पाठपुरावा करणारे लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# नियम बाहय काम करुन लाखो रुपयेचे बील देऊन ग्रामसेवक, प्रशासक यांनी शासनाला फसवले आहे

माजलगाव । प्रतिनिधी



ग्रामपंचायत हरकी निमगाव येथील ग्रामसेवक विलास मोरे आणि प्रशासक गालफाडे यांनी ग्रा.प.१५ वा वित्त आयोग आणि दलित वस्ती पंथ दिवे यात नियम बाह्य काम करुन बीले उचलून दिले असुन शासनाच्या निधीचा गैर वापर केला आहे. वरील संदर्भात दि.२५/९/२०२५, दि.९/६/२०२५, दि.८/९/२५, दि.३०/०९/२०२५ रोजी वरील कामाची चौकशी करावी म्हणून वेळोवेळी तक्रार दिली होती यात अमरण उपोषण चा सुद्धा अर्ज दिलेला होता, यात गटविकास अधिकारी मुळुका मॅडम यांनी दि.६/८/२०२५ रोजी पत्र देऊन श्री गायकवाड साहेब,विस्तार आधिकारी यांना चौकशीचे आदेश पत्र दिले होते पण अद्याप कोणतीच कारवाई झालेली नाही. दलित वस्ती दुहेरी पंप, जार पिलॅट, समाज मंदीर दूरूस्ती, नाली बांधकाम, रस्ते, खरेदी पंथ दिवे ई.कामे केली आहेत, पण यात अनेक कामे कार्यान्वित नाहीत व काही कामे अर्धवट स्थितीत आहेत. मात्र बिले उचले आहेत.

▶ उर्वरित पान २ वर

## पद्माक्षी'तर्फे बीडमध्ये खरेदीचा महाउत्सव ७ व ८ ऑक्टोबर २०२५ रोजी विविध स्टॉल्स ग्राहकांच्या सेवेत

बीड । प्रतिनिधी

बीडकर ग्राहकांसाठी एकाच छताखाली विविध वस्तू खरेदी करण्याची सुवर्णसंधी पुन्हा एकदा उपलब्ध झाली आहे. 'पद्माक्षी'तर्फे आयोजित करण्यात आलेल्या व्यावसायिक प्रदर्शनात ७ व ८ ऑक्टोबर २०२५ रोजी अमृत मंगल कार्यालय, सुभाष रोड, बीड येथे विविध स्टॉल्स उभारले जाणार आहेत. या स्टॉल्समध्ये दिवाळीसाठी विशेष घर सजावटीच्या वस्तू, देवांचे वस्त्र, साड्या, ड्रेसेस, कुर्ते, रेडीमेड कपडे, दागदागिने आणि कलात्मक वस्तू खरेदीसाठी उपलब्ध असतील. प्रदर्शनात विविध ठिकाणचे नागरिक व्यापारी आणि उद्योजकांनी आपापले खास उत्पादने मांडली असून, ग्राहकांना दर्जेदार आणि आकर्षक वस्तू खरेदी करण्याची संधी मिळणार आहे. हा उपक्रम पद्मा हेमंत बियाणी व मीनाक्षी अमित सिकची यांच्या पुढाकाराने राबवला जात आहे. बीडकर

▶ उर्वरित पान २ वर

## माजलगावात शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सव २०२५ चे आयोजन नाभिक महामंडळाच्या वतीने विवीध कार्यक्रमांची रेलचेल

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र नाभिक महामंडळ व बीड जिल्हा व समस्त नाभिक समाज माजलगावच्या वतीने शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले असुन रक्तदान शिबीर, शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

जीवला जीव देणा-या जिवाची जयंती उपक्रमांतर्गत शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सवात दि. ९ ऑक्टोबरला छत्रपती संभाजी महाराज चौकात सकाळी १०.०० वाजता भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असुन यावेळी आमदार प्रकाश सोळंके, नाभिक महामंडळाचे अध्यक्ष कल्याण दळे, छत्रपती कारखान्याचे उपाध्यक्ष मोहन जगताप यांची उपस्थिती असणार आहे तर दु. ४.०० वाजता भव्य शोभायात्रा छत्रपती संभाजी महाराज चौक ते हनुमान चौकापर्यंत काढण्यात येणार असुन मा. सभापती जयसिंह सोळंके, मा. उपमहापौर भगवान वाघमारे, भाजपानेते ज्ञानेश्वर नाना मेंडके यांचेसह मा. आ. राधाकृष्ण होके पाटील, बहुजन नेते बाबुराव पोटभरे, मा. सभापती अशोक डक, नितीन नाईकनवरे, सभापती जयदत्त नरवडे, शिवाजी रांजवण, डॉ. सुरेश साबळे, उपसभापती श्रीहरी मोरे, तुकाराम येवले अच्युत लाटे यांचेसह अनेक मान्यवरांची उपस्थिती

▶ उर्वरित पान २ वर

## करुणा-मैत्रीच्या मार्गानेच मानवतेचा उद्धार

- धम्मपरिषदेत डॉ.खेमधम्मो महाथेरोंचे प्रतिपादन
- शिवणी येथे महाविहार धम्मभूमीत लोटला जनसमुदाय



बीड । प्रतिनिधी

जगाला प्रज्ञा, शील, करुणा-मैत्रीची शिकवण देणारा, मानवतेचा खरा दीपस्तंभ म्हणजे सम्यक संबुद्ध गौतम बुद्ध होय. त्यांनी दिलेला धम्म म्हणजे केवळ एका धम्मपथाचा उपदेश नसून, मानवी जीवनाला दिशा देणारा शाश्वत मार्ग आहे. असे विचार उदघाटक भदंत डॉ. खेमधम्मो महाथेरो यांनी व्यक्त केले.

▶ उर्वरित पान २ वर

# नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी एकोपा महत्वाचा : रामदेवजी अग्रवाल

- जाती-पातीत, गटा-तटात विभागू नका ; जलनायक मयंक गांधी यांचे शेतकऱ्यांना आवाहन
- ८ ग्लोबल विकास ट्रस्टचे दतृत्व ; १६ गावांतील ३ हजार कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंची मदत

परळी वै. । प्रतिनिधी



ग्लोबल विकास ट्रस्टने जेंव्हा मराठवाडा भागात काम करण्यास सुरुवात केली तेंव्हा येथे दुष्काळी परिस्थिती होती. शेतीसाठी सोडाच परंतु पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष असलेला हा भाग होता. सामाजिक भावनेने या भागासाठी काहीतरी केले पाहिजे हा उद्देश घेऊन मयंक गांधी बीड जिल्ह्यात आले आणि त्यांनी येथे दुष्काळ मुक्तीच्या कामाला सुरुवात केली. आज त्या गोष्टीला जवळपास सात ते आठ वर्षे उलटून गेली, आता परिस्थिती आली आहे ओल्या दुष्काळाची. अतिवृष्टी झाल्याने येथील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाल्याचे आम्ही पाहत आहोत. काळ बदलतोय, संकटांचे स्वरूप बदलते आहे. आपण मात्र बदलायला तयार नाहीयेत. आपण बदलले पाहिजे बदलत्या संकटांना तोंड देण्यासाठी एकत्रपणे सज्ज व्हायला हवे. नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांचा एकोपा महत्वाचा असल्याचे परखड मत रामदेवजी अग्रवाल यांनी व्यक्त केले. परळी वैजनाथ


▶ उर्वरित पान २ वर





जि.प.प्रा.सरकारखोरी शाळेचे माजी मुख्याध्यापक तुकाराम राठोड सरांना निरोप समारंभाच्या शुभेच्छा दिल्या..तसेच शाळेचे नवयुक्त मुख्याध्यापक एस. आंधळे सरांना शुभेच्छा दिल्या... यावेळी पत्रकार संभाजी लांडे, सचिन नागरगोजे, विनोद राठोड महेंद्र चौरे आदी उपस्थित होते.

# कपिलधारवाडी : रस्त्यांच्या भेगा, घरांच्या तड्यात वाढ; ग्रामस्थांचा वावर अजूनही वाडीतच; प्रशासनाने घ्यावी तातडीने दक्षता



बीड । प्रतिनिधी

सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे बालाघाटाच्या कुशीत वसलेल्या कपिलधारवाडीत डोंगर खचू लागल्याची धोकादायक घटना समोर आली आहे. यामुळे अनेक घरांच्या तसेच जिल्हा परिषदेच्या शाळेच्या भिंतींना तडे गेले आहेत. कपिलधारवाडीत सध्या ९५ घरे व सुमारे ५०० लोकसंख्या असून गावकरी अक्षरशः जीव मुठीत धरून राहत आहेत. गेल्या पाच वर्षांपासून पुनर्वसनाची मागणी करूनही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने पुणे जिल्ह्यातील माळीणसारखी दुर्घटना घडण्याची प्रशासन वाट पाहत आहे काय ? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींची पाहणी : या घटनेची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरिश धार्मिक, तहसीलदार चंद्रकांत शेळके तसेच संबंधित लोकप्रतिनिधींनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यानंतर तांत्रिक समितीद्वारे भेगांची तपासणी करून कायमस्वरूपी पुनर्वसनाची कार्यवाही केली जाईल, अशी ग्वाही प्रशासनाने दिली आहे. सध्या कपिलधारवाडीतील नागरिकांना मन्मथ स्वामी देवस्थान येथे तात्पुरते स्थलांतरित करून राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र तरीही काही ग्रामस्थांचा वावर गावात सुरू असून कधीही दुर्घटना घडण्याचा धोका कायम आहे. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, प्रशासनाने तातडीने दक्षता घेऊन स्थिर पुनर्वसनाची पावले उचलली नाहीत, तर मोठी मानवी हानी होऊ शकते.